**शिक्षकीय पदांचा आकृतीबंध निश्चित**
**करणे बाबत.............**
**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी**
**महिला विद्यापीठ, मुंबई**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. डब्ल्युयुएस-२००८/(६८/०८)/विशि (प्रशा)
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ मे, २००९.

**वाचा :** (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१०.९.२००१.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा, दिनांक १.७.२००४.
(३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.युएनआय २००८/एसएनडीटी/प.अ./ विशि-१/१००३४, दिनांक २६ डिसेंबर, २००८ चे पत्र.
(४) कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई यांचे क्र.जीएडी/एससी-जनरल/२००८-०९/ १४९३, दिनांक ३० मार्च, २००९ चे पत्र.

**प्रस्तावना :-** वित्त विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१०.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करावे व आकृतिबंध अंतिम झाल्याशिवाय रिक्त पदे भरु नयेत असे सर्व प्रशासकीय विभांगाना आदेशित केले. वित्त विभागाच्या वरील निर्णयानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या शिक्षकीय व शिक्षकेतर पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

२. सदर प्रक्रियेला लागणारा विलंब लक्षात घेता शासनाने संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक १ जुलै, २००४ च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय प्रवर्गांची ९०% व खुल्या प्रवर्गाची ५०% रिक्त पदे भरण्याची मुभा दिली. अशी सूट देऊनही अपुऱ्या मनुष्यबळामुळे विद्यापीठाच्या कामावर विपरीत परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. वित्त विभागाच्या दि.१०.९.२००१ च्या निर्णयामुळे एका बाजुला सन २००१ रोजी अस्तित्वात असलेली रिक्त पदे भरता आली नाहीत, तर दुसऱ्या बाजुला सन २००१ नंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेल्या पदांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेता आला नाही. दरम्यानच्या काळामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने

याचिका क्र.८०६७/२००६ मध्ये दि.०६-०४-२००९ रोजी व नागपूर खंडपीठ यांनी सुमोटो याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये दिनांक ३-१२-२००८ रोजी राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती पावले उचलावीत व विद्यापीठाचा आकृतिबंध त्वरीत निश्चित करावा असे आदेशित केले.

३. विद्यापीठातील अपुऱ्या मनुष्यबळामुळे शिक्षणावर होणारा संभाव्य दुष्परिणाम व मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेता आकृतिबंध त्वरीत निश्चित करणे अपरिहार्य झाले आहे म्हणून सन २००१ नंतर वाढलेल्या कामासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकीय पदांचा पूर्णपणे विचार न करता सन २००१ पर्यंत शासनाने मंजूर केलेली शिक्षकीय पदेच प्रामुख्याने आधारभूत समजून आकृतीबंध निश्चित करण्याचे ठरविले आहे.

४. वरील बाबींचा विचार करुन विभागाने **श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई** या विद्यापीठाच्या शिक्षकीय पदांच्या आकृतिबंधांचा प्रस्ताव शासनास सादर केला व त्यास मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या उच्च स्तरीय सचिव समितीने दि.८.५.२००९ रोजी मान्यता दिली. त्यानुसार श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाच्या शिक्षकीय पदांच्या आकृतीबंधासंदर्भात खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय

५. श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठासाठी सोबतच्या प्रपत्र "अ" व "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे २५२ पूर्णवेळ व ७ अर्धवेळ शिक्षकीय पदांचा आणि २१ शिक्षकीय समकक्ष पदांच्या आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांचा सविस्तर तपशील प्रपत्र "क", "ड" आणि "इ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

६. विद्यापीठाने वरील आकृतीबंधाच्या अधीन राहून शासनाने मंजूर केलेल्या सर्व शिक्षकीय पदांपैकी रिक्त असलेली अनुदानित पदे विहित कार्यपध्दती अनुसरुन त्वरीत भरण्यात यावी.

७. विद्यापीठाच्या स्वनिधीतून नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तिची थेट नियुक्ती अथवा अदलाबदली शासन मान्य अनुदानित पदावर करण्यात येऊ नये.

८.	सर्व अनुदानित पदांवरील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची विस्तृत माहिती विद्यापीठाने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच संबंधित विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) यांच्याकडे तात्काळ सादर करावा. संचालक, उच्च शिक्षण यांनी सर्व बाबी पडताळून पहाव्यात व त्याचा अभिलेख जतन करावा.

९.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २७०/०९ विसु-१ दि. २/५/२००९ अन्वये आणि उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१०.	हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २००९०५३०१२२३२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन,
२) मा. कुलगुरु, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,
३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) सर्व सह संचालक, उच्च शिक्षण,
५) कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
७) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
८) जिल्हा कोषाधिकारी, पुणे
९) वित्त विभाग
१०)निवड नस्ती, विशि (प्रशा)

## श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,

**(शासन निर्णय क्र. डब्ल्यूयुएस २००८/(६८/०८)-विशि (प्रशा), दिनांक २७-०५-२००९ चे सहपत्र.)**

**प्रपत्र "अ"**

**शिक्षकीय पदांचा मंजूर आकृतिबंध**

**शिक्षक पदे**

| संवर्गनिहाय पदनाम (१) | वेतनश्रेणी (२) | आकृतिबंधांतर्गत मान्य पदांची एकूण संख्या (३) |
|---|---|---|
| प्राध्यापक | रु.१६४००-२२४०० | २० |
| प्रपाठक | रु.१२०००-१८३०० | ५० |
| अधिव्याख्याता | रु.८०००-१३५०० | १७८ |
| | एकुण... | २४८ |

**<u>शासन निर्णय क्र. डब्ल्यूयुएस २००८/(६८/०८)-विशि (प्रशा), दिनांक २७-०५-२००९ चे सहपत्र.</u>**

**प्रपत्र "ब"**
**शिक्षक समकक्ष पदांचा तपशील**

| समकक्ष पदे | वेतनश्रेणी | मंजूर पदे | नव्याने निर्माण करावयाची पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| ग्रंथपाल<br>(प्राध्यापक पदाशी समकक्ष) | १६४००-२४०० | १ | ०० | १ |
| संचालक ( प्रौढ व निरंतर शिक्षण )<br>(प्राध्यापक पदाशी समकक्ष) | १६४००-२४०० | १ | ०० | १ |
| सहायक संचालक<br>(प्रौढ व निरंतर शिक्षण )<br>(प्रपाठक पदाशी समकक्ष) | १२०००-१८३०० | ४ | ०० | ४ |
| उप ग्रंथपाल<br>(प्रपाठक पदाशी समकक्ष) | १२०००-१८३०० | ३ | ०० | ३ |
| संचालक ( शारीरिक शिक्षण) | १०६५०-१५८५० | १ | ०० | १ |
| प्रकल्प अधिकारी<br>(अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | ४ | ०० | ४ |
| सहायक ग्रंथपाल<br>(अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | ४ | ०० | ४ |
| सहायक संचालक (शारीरिक शिक्षण)<br>(अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | १ | ०० | १ |
| महाविद्यालयीन ग्रंथपाल<br>(अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | २ | ०० | २ |
| एकुण | | २१ | ०० | २१ |

**(शासन निर्णय क्र. डब्ल्यूयुएस २००८/(६८/०८)-विशि (प्रशा), दिनांक २७-०५-२००९ चे सहपत्र.)**

## प्रपत्र "क"

## आकृतिबंधाप्रमाणे शिक्षकीय पदांचा सविस्तर तपशील

| अ. क्र. | विषय | | आढाव्यापूर्वी शासनाने मंजूर केलेल्या पदांची संख्या | | | आकृतिबंधांतर्गत मान्य पदांची एकूण संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राध्यापक | प्रपाठक | अधिव्याख्याता | प्राध्यापक | प्रपाठक | अधिव्याख्याता |
| ०१ | मराठी | (पुणे) | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | १ |
| | | (मुंबई) | ०१ | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ०३ |
| ०२ | इंग्रजी | (मुंबई) | ०० | ०१ | ०३ | ०० | ०१ | ०३ |
| ०३ | समाजशास्त्र | (मुंबई) | ०१ | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ०३ |
| ०४ | अर्थशास्त्र | (पुणे) | ०० | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०२ |
| | | (मुंबई) | ०१ | ०२ | ०४ | ०१ | ०२ | ०४ |
| ०५ | मानसशास्त्र | (पुणे) | ०० | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०२ |
| | | (मुंबई) | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०२ | ०२ |
| ०६ | कॉमर्स | (पुणे) | ०० | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०२ |
| | | (मुंबई) | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ०७ | राज्यशास्त्र | (मुंबई) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| ०८ | संस्कृत | (मुंबई) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| ०९ | हिंदी | (पुणे) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| | | (मुंबई) | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०२ |
| १० | गुजराती | (मुंबई) | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०२ | ०२ |
| ११ | इतिहास | (मुंबई) | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०२ |
| १२ | संगित | (पुणे) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| | | (मुंबई) | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| १३ | चित्रकला | (पुणे) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| | | (मुंबई) | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०२ |
| १४ | भूगोल | (पुणे) | ०० | ०२ | ०१ | ०० | ०२ | ०१ |
| १५ | एज्युकेश | (पुणे) | ०० | ०१ | ०४ | ०० | ०१ | ०४ |
| | | (मुंबई) | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०२ |
| १६ | भाषाशास्त्र शिक्षणसेवा | (मुंबई) | ०० | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०२ |
| १७ | एज्युकेशन टेक्नॉलॉजी | (मुंबई) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| १८ | गायडन्स व कौन्सिलींग | (मुंबई) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| १९ | स्पेशल एज्युकेशन | (मुंबई) | ०१ | ०२ | ०५ | ०१ | ०२ | ०५ |
| २० | होम सायन्स एक्स्टें.एज्यु. | (मुंबई) | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०२ | ०० |
| २१ | फुड सायन्स ॲन्ड न्युट्रिशन | (मुंबई) | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०१ |
| २२ | टेक्स्टाईल ॲन्ड क्लोथिंग | (मुंबई) | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०१ |
| २३ | ह्युमन डेव्हलपमेंट | (मुंबई) | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| २४ | फॅमिली रिसोर्स मॅनेजमेंट | (मुंबई) | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०१ |
| २५ | ॲनालिटीकल केमिस्ट्री | (मुंबई) | ०१ | ०१ | ०४ | ०१ | ०१ | ०४ |
| २६ | कम्प्युटर सायन्स | (मुंबई) | ०० | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०२ |
| २७ | कम्युनिकेशन मिडिया फॉर चिल्ड्रन | (मुंबई) | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| २८ | रिसर्च सेंटर फॉर विमेन स्टडीज | (मुंबई) | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०२ | ०२ |
| २९ | लायब्ररी सायन्स | (मुंबई) | ०० | ०१ | ०५ | ०० | ०१ | ०५ |
| ३० | एज्युकेशन मॅनेजमेंट | (मुंबई) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| ३१ | ॲडल्ट एज्युकेशन | (पुणे) | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ |
| ३२ | होमसायन्स फुड सायन्स ॲन्ड न्युट्रिशन | (पुणे) | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० |
| --- | चार महाविद्यालये | - | ०० | ०२ | १०६ | ०० | ०२ | १०६ |
| | | एकूण पदे . . ... | २० | ५० | १७८ | २० | ५० | १७८ |

**शासन निर्णय क्र. डब्ल्यूयुएस २००८/(६८/०८)-विशि (प्रशा), दिनांक २७-०५-२००९ चे सहपत्र.**

**प्रपत्र "ड"**
**आकृतिबंधांतर्गत मान्य अर्धवेळ अधिव्याख्याता पदांचा तपशील**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | विषय | आकृतिबंधांतर्गत मान्य केलेल्या पदांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १ | एस.एन.डी.टी.कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे | वाणिज्य | १ |
| | | भूगोल | १ |
| २. | एस.एन.डी.टी.होम सायन्स महाविद्यालय, पुणे | फॅमिली रिसोर्स मॅनेजमेंट | १ |
| | | फुड सायन्स ॲन्ड न्युट्रिशन | २ |
| | | फिजिऑलॉजी | १ |
| ३. | पदव्युत्तर अभ्यास व संशोधन विभाग, पुणे | हिंदी | १ |
| | | एकूण | ७ |

**शासन निर्णय क्र. डब्ल्यूयुएस २००८/(६८/०८)-विशि (प्रशा), दिनांक २७-०५-२००९ चे सहपत्र.**

**प्रपत्र "इ"**
**आकृतिबंधांतर्गत मान्य प्राचार्य पदांचा तपशील**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | वेतनश्रेणी | आकृतिबंधांतर्गत मान्य पदांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १ | एल.टी. कॉलेज ऑफ नर्सिंग, मुंबई | १६४००-२२४०० | १ |
| २ | एस.एन.डी.टी. कला व एस.सी.बी.वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, मुंबई | १६४००-२२४०० | १ |
| ३ | एस.एन.डी.टी. कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे. | १६४००-२२४०० | १ |
| ४ | एस.एन.डी.टी. होम सायन्स महाविद्यालय, पुणे. | १६४००-२२४०० | १ |
| | | **एकूण** | ४ |

प्रस्तुत प्रकरण श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठातील शिक्षकीय पदांच्या आढावा घेऊन आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत आहे.

सदर विद्यापीठातील शिक्षकीय पदांच्या आकृतीबंधास संयुक्त सचिव समितीने दिनांक ४-४-२००९ रोजीच्या बैठकीमध्ये त्याचप्रमाणे दिनांक ८-५-२००९ रोजी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार आवश्यक तो शासन निर्णय निर्गमित करण्यास हरकत नसावी. शासन निर्णयाचा मसुदा मान्यतेसाठी पृ. क्र. /प.वि. वर सादर.

क.अ.(विशै-१)

स.स.(विशि)

मा.प्र.स.(उ. व तं.शि.)